# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
**Pune Metropolitan Region Development Authority.**
**नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी, पुणे-४११०४४.**
पुणे महानगर
Email :- illegalconstructions.pmrda@gmail.com
दुरध्वनी क्र.०२०-२७६५२९३४

जा.क्र./पु.म.प्र.वि.प्रा./अ.बां.नि./१८४८ दिनांक ०६/६/२०२५

प्रति,

मा. नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे

विषय :- पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण येथील अनाधिकृत बांधकाम धारकांची विक्री नोंदणी न करणे तसेच इतर अनुषंगिक बाबी न पुरविणेबाबत...

संदर्भ :- पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण येथील अनाधिकृत बांधकामांना प्रतिबंध करण्याच्या अनुषंगाने उपाययोजना.

महोदय,

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना ३१-०३-२०१५ अधिसूचनेनुसार झाली असून पीएमआरडीए क्षेत्रामध्ये ६९७ गावांचा समावेश आहे. यामध्ये हवेली, मुळशी, खेड, भोर, दौंड, शिरूर, मावळ, पुरंदर, आदी तालुके येतात. पु.म.प्र.वि.प्रा. अंतर्गत अनधिकृत बांधकाम विभाग कार्यरत असून या विभागामार्फत कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामांना प्रतिबंध, अनधिकृत बांधकामे निष्कासित करणे या स्वरूपाचे कामकाज पार पाडले जाते.

उपरोक्त विषयांन्वये, आपणास कळविण्यात येते की, पु.म.प्र.वि.प्रा. कार्यक्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर अनधिकृत प्लॉटींग व बांधकामे चालू असल्याच्या तक्रारी या कार्यालयाकडे येत असतात. सर्व सामान्य नागरिकांकडून अनधिकृत प्लॉटिंग व बांधकामांची खरेदी-विक्री होत असल्याचे अनेकदा निर्दशनास येते. यामुळे सर्व सामान्य नागरिकांची फसवणूक होतेच मात्र यासोबत अनधिकृत प्लॉटिंग/बांधकामांची खरेदी-विक्री होत असल्याने संबंधित प्लॉट/बांधकाम विकसक अनधिकृत विकसन न धजावता करतात. याद्वारे मोठ्या प्रमाणावर अनधिकृत प्लॉट/बांधकामे चालू राहतात व शहरे अर्निबंध रित्या वाढून विकास कामांना आळा बसतो.

**तरी याद्वारे** आपणास विनंती करणेत येते की, आपले अधिनस्त उपनिबंधक यांना त्यांचे **कार्यक्षेत्रात अनधिकृत** प्लॉट/बांधकामांची खरेदी-विक्री होणार नाही याची दक्षता घेणेबाबत सुचना करणेत याव्यात.

(डॉ.दिप्ती सुर्यवंशी-पाटील)
सह आयुक्त(प्र)
अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे

**प्रत माहितीस्तव** :-१. मा. महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचे स्वीय सहायक

२. मा. अतिरिक्त महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचे स्वीय सहायक

३. मा. मुख्य दक्षता अधिकारी, पु.म.प्र.वि.प्रा. पुणे

**प्रत माहित तथा उचित कार्यवाहीस्तव** :- मा. अधिक्षक, भूमी अभिलेख विभाग, पुणे

# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
**Pune Metropolitan Region Development Authority.**
**नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी, पुणे-४११०४४.**
पुणे महानगर
Email :- illegalconstructions.pmrda@gmail.com
दूरध्वनी क्र.०२०-२७६५२१३४


जा.क्र./पु.म.प्र.वि.प्रा./अ.बां.नि.वि/७९५० दिनांक ०६/०६/२०२५

**प्रति,**

**अधिक्षक अभियंता,**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., (MSEDCL),**
**पुणे ग्रामीण पुणे.-४१२१०५**

विषय :- पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण येथील अनाधिकृत बांधकाम धारकांना विद्युत जोडणी न पुरविणे बाबत.

संदर्भ:- पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण येथील अनाधिकृत बांधकामांना प्रतिबंध करण्याच्या अनुषंगाने उपाययोजना.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना ३१-०३-२०१५ अधिसूचनेनुसार झाली असून पीएमआरडीए क्षेत्रामध्ये ६९७ गावांचा समावेश आहे. यामध्ये हवेली, मुळशी, खेड, भोर, दौंड, शिरूर, मावळ, पुरंदर, आदी तालुके येतात. पु.म.प्र.वि.प्रा. अंतर्गत अनधिकृत बांधकाम विभाग कार्यरत असून या विभागामार्फत कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामांना प्रतिबंध, अनधिकृत बांधकामे निष्कासीत करणे या स्वरूपाचे कामकाज पार पाडले जाते.

उपरोक्त विषयांन्वये, आपणास कळविण्यात येते की, पु.म.प्र.वि.प्रा. कार्यक्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे चालू असल्याच्या तक्रारी या कार्यालयाकडे येत असतात. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे सदर गावांकरीता विकास प्राधिकरण असल्याने या प्राधिकरणाने निहीत कार्यपद्धतीने मंजूर केलेली बांधकामे या व्यतिरिक्त इतर कोणासही वीज जोडणी देणेत येऊ नये. ज्यामुळे भविष्यातील नियोजित विकासाल बाधा येणार नाही. या उपर वीज जोडणी झालेस पुढील उद्भवणाऱ्या परिस्थितीस आपण जबाबदार रहाल याची नोंद घेण्यात यावी.

(डॉ.दिप्ती सुर्यवंशी-पाटील)
सह आयुक्त(प्र)
अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे

प्रत माहितीस्तव :-१. मा. महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचे स्वीय सहायक
२. मा. अतिरिक्त महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचे स्वीय सहायक
३. मा. मुख्य दक्षता अधिकारी, पु.म.प्र.वि.प्रा. पुणे

# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
**Pune Metropolitan Region Development Authority.**

नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी, पुणे-४११०४४.

पुणे महानगर

Email :- illegalconstructions.pmrda@gmail.com

दुरध्वनी क्र.०२०-२७६५२९३४


जा.क्र./पु.म.प्र.वि.प्रा./अ.बां.नि./१९५२ दिनांक ०६/६/२०२५

**प्रति,**

**अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पुणे**

विषय :- पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण येथील अनाधिकृत बांधकामांना प्रतिबंध करण्याच्या अनुषंगाने उपाययोजना.

संदर्भ:- पु.म.प्र.वि.प्रा. कार्यक्षेत्रात अनधिकृत पब बार बाबत प्राप्त तक्रारी.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना ३१-०३-२०१५ अधिसूचनेनुसार झाली असून पीएमआरडीए क्षेत्रामध्ये ६९७ गावांचा समावेश आहे. यामध्ये हवेली, मुळशी, खेड, भोर, दौंड, शिरूर, मावळ, पुरंदर, आदी तालुके येतात. पु.म.प्र.वि.प्रा. अंतर्गत अनधिकृत बांधकाम विभाग कार्यरत असून या विभागामार्फत कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामांना प्रतिबंध, अनधिकृत बांधकामे निष्कासित करणे या स्वरूपाचे कामकाज पार पाडले जाते.

उपरोक्त संदर्भान्वये, आपणास कळविण्यात येते की, पु.म.प्र.वि.प्रा. कार्यक्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर अनधिकृत पब बार चालू असल्याच्या तक्रारी या कार्यालयाकडे येत असतात. सदर अनधिकृत पब बारचे निष्कासन कारवाई दरम्यान संबंधित हॉटेल पब बार चालक सदर पब बार ला आपले विभागाकडील परवाना दाखवून निष्कासन कारवाईस विरोध करतात. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होते.

तरी या द्वारे आपणास विनंती करण्यात येते की, आपले विभागामार्फत मद्य विक्री, बार हॉटेल आदींसाठी परवाने देताना सदर बांधकामास सक्षम प्राधिकरणाची परवानगी आहे किंवा कसे हे तपासून परवाना देण्याची कार्यवाही पार पाडावी व अनधिकृत इमारतींमध्ये परवाने देणे थांबवणेस विनंती आहे.

O/C

(डॉ.दिप्ती सुर्यवंशी-पाटील)
सह आयुक्त(प्र)
अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे

प्रत माहितीस्तव :-१. मा. महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचे स्वीय सहायक

२. मा. अतिरिक्त महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचे स्वीय सहायक

३. मा. मुख्य दक्षता अधिकारी, पु.म.प्र.वि.प्रा. पुणे

# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

**Pune Metropolitan Region Development Authority.**

**नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी, पुणे-४११०४४.**

पुणे महानगर

**Email :- illegalconstructions.pmrda@gmail.com** **दूरध्वनी क्र.०२०-२७६५२९३४**


जा.क्र./पु.म.प्र.वि.प्रा./अ.बां.नि./१८५१ दिनांक ०६/०६/२०२५

प्रति,

**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद पुणे.**

विषय :- पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण येथील अनाधिकृत बांधकाम धारकांना नळ जोडणी / पाणीपुरवठा व इतर अनुषंगिक बाबी न पुरविणेबाबत...

संदर्भ:- पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण येथील अनाधिकृत बांधकामांना प्रतिबंध करण्याच्या अनुषंगाने उपाययोजना

महोदय,

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना ३१-०३-२०१५ अधिसूचनेनुसार झाली असून पीएमआरडीए क्षेत्रामध्ये ६९७ गावांचा समावेश आहे. यामध्ये हवेली, मुळशी, खेड, भोर,दौंड,शिरूर, मावळ, पुरंदर, आदी तालुके येतात. पु.म.प्र.वि.प्रा. अंतर्गत अनधिकृत बांधकाम विभाग कार्यरत असून या विभागामार्फत कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामांना प्रतिबंध, अनधिकृत बांधकामे निष्कासित करणे या स्वरूपाचे कामकाज पार पाडले जाते.

उपरोक्त विषयांन्वये, आपणास कळविण्यात येते की, पु.म.प्र.वि.प्रा. कार्यक्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे चालू असल्याच्या तक्रारी या कार्यालयाकडे येत असतात. सदर अनधिकृत बांधकामांना आपले अधिनस्त ग्रामपंचायतीकडून नळ जोडणी देणे/पाणी पुरवठा करणे, व इतर अनुषंगिक सोयी पुरविणे तसेच सदर अनधिकृत बांधकामाची नोंद ८अ उताऱ्यावर घेणे या सारख्या बाबी होत असल्याने याचा आधार घेऊन बांधकामधारक न धजावता अनधिकृत बांधकामे करत राहतात. त्यामुळे अनधिकृत बांधकामांची संख्या वाढत आहे. यामुळे विकास कामांना देखील आळा बसतो.

याद्वारे आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या अधिनस्त सर्व ग्रामपंचायतींना अनधिकृत बांधकामांना नळ जोडणी / पाणी पुरवठा न करणे, इतर कोणत्याही सुविधा न देणे, अनधिकृत बांधकामांची ८अ वर नोंद न घेणे याबाबत सूचना देणेत याव्यात. जेणेकरून अनधिकृत बांधकामांना आळा घालता येईल.

तसेच संबंधित ग्रामपंचायतीस त्यांचे हद्दीमध्ये अधिकृत बांधकामे होतील या अनुषंगाने जनजागृती करणेबाबतच्या सूचना निर्गमित करण्यात याव्यात ही विनंती.

(डॉ.दिप्ती सुर्यवंशी-पाटील)
सह आयुक्त(प्र)
अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे

O/C

प्रत माहितीस्तव :-१. मा. महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचे स्वीय सहायक

२. मा. अतिरिक्त महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचे स्वीय सहायक

३. मा. मुख्य दक्षता अधिकारी, पु.म.प्र.वि.प्रा. पुणे

प्रत उचित कार्यवाहीस्तव:- गटविकास अधिकारी (हवेली, मुळशी, खेड, भोर,दौंड,शिरूर, मावळ, पुरंदर, आदी तालुके)